जा.क्र.नांवाशमनपा/नसका/CR- / ९७ /२०१५
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक-:२६.५.२०१५

**<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.</u>**

**<u>सर्वसाधारण सभेची सूचना</u>**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम **1949** चे अनुसूची ‘ड’ चे प्रकरण-**2** मधील
नियम क्र.**1** अन्वये

मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम 1949 चे अनुसूचि (ड) चे प्रकरण 2 मधील नियम क्र .१ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापौर सौ.शैलजा किशोर स्वामी यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा दि. ४.६.२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेडच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील कै .शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजित केली आहे.

करीता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी निर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| **महापौर** | **गरसचिव,** |
| नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.. | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड. |

प्रति,
श्री /श्रीमती ____________________
सदस्य /सदस्या, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**<u>कार्यक्रम पत्रिका</u>**

**विषय क्र.१**

नांवामनपाकेतील पात्र कर्मचा-यांना दि.१ एप्रिल २०१४ ते ३१ जूलै २०१४ या कालावधीतील वाहतुक भत्याची थकबाकीची रक्कम अदाई करण्यासाठी नांवामनपा आदेश प.क्र.नांवाशमनपा/लेवि/६४३/२०१५ दि.१७ एप्रिल २०१५ अन्वये प्रशासकीय व आथिक मान्यता प्रदान करण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**विषय क्र.२**

मा.श्रीमती अंजली सुरेश गायकवाड, स.सदस्या, नांवामनपा नांदेड यांनी दि.२०.४.२०१५ रोजी पत्र देवून दोन अडीच हजार वर्षाचा इत्हिास असलेले, जगाला शांततेचे मार्ग देणारे तथागत भगवान गौतम बुध्द यांची जयंती महानगरपालिकेतर्फे साजरी करण्यात यावी. ज्यामूळे नविन उपक्रमाने समाजापुढे एकात्मतेचे प्रतिक दाखवून देवू शकते. व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड. नाव उचावेल असे नमूद केले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६(२१),(२२),(२५), (२६) व (४१) मधील तरतूदीनूसार तयार करण्यात आलेल्या नियमावलीमधील मुददा क्रमांक ०५ अन्वये नांवामनपाकडून थोर राजकिय व सामाजिक महापुरुषांच्या जयंती /पुण्यतिथी शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देषानूसार महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या सभागृहात साज-या करण्यात येतील. महानगरपालिकेची परंपरा व शासन निर्देशाव्यतिरिक्त इतर कोणतीही जयंती/पुण्यतिथी साजरी करता येणार नाही असे नमूद आहे.

शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या शासन परिपत्रकात व महानगरपालिकेच्या परंपरेनुसार तथागत भगवान गौतम बुध्द याची जयंती साजरी करणे बाबत अद्याप पावेतो कोणतेही आदेश प्राप्त नाहीत.

तथापी नावामनपा क्षेत्रातर्गत विविध सामाजिक संघटना व भारतीय बौध्द महासभा यांचे तर्फे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात बुध्द पौर्णिमे निमित्य विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार सदर ठिकाणी प्रतिवर्षी महानगरपालिकेतर्फे साफसफाई ,शामियाने ,ध्वनीक्षेपण ,पिण्याचे पाणी ,स्वतंत्र बॅराकेटींग इ.सुविधा पुरविण्यात येतात.

करीता स.सदस्यांनी पत्रात नमूद केल्यानुसार तथागत भगवान बुदध यांची जयंती प्रतिवर्षी महानगरपालिकेतर्फे साजरी करण्यास मान्यता देणे बाबत.

**विषय क्र.३**

श्री अभिषेक सौदे, स.सदस्य नांवामनपा नांदेड व श्री विजय निलंगेकर ,पत्रकार तथा संयोजक बुदध प्रभाग कार्यक्रम यांनी विश्वाला शांतीचा संदेश देणारे तथागत गौतम बुदध् यांच्या जयंती निमित्याने मे महिण्यातील पौर्णिमेच्या दिवशी पहाटे ५.०० ते ८.०० या वेळेत भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात महाराष्ट्रातील ख्यातनाम गायकांचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून सदर कार्यक्रमासाठी महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत देण्याची यावी अशी विनंती दि.९.४.२०१५ व दि.२२.४.२०१५ रोजी केली होती , मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६(२१),(२२),(२५), (२६) व (४१) अन्वये सास्कतिक कार्यक्रम /क्रिडा/महिला व बाल कल्याण संस्थाना देण्यात येणा-या अनुदानाची नियमावली तयार केली असून या नियमावली अनुदान वाटपाची कार्य पध्दत कलम ३ नियम ५ मध्ये नमूद केल्यानुसार कोणत्याही विविध पंजीकृत अथवा नोंदणी कृत शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, साहित्य, कला क्रिडा नाटय क्षेत्रातील संस्थेस किंवा त्या संस्थेच्या संलग्न संस्थेस ३ वर्षातून एकदा अनुदान देण्याची तरतूद आहे. तथापी अनुदान मागणीसाठी अर्ज करते वेळेस खालील कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.

१) संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत
२) संस्थेच्या वार्षीक लेखा परिक्षण अहवालाची प्रत
३) संस्थेचे चार्टड अकाऊन्ट यांच्या मार्फत झालेल्या लेखा परिक्षणची प्रत
४) शैक्षणिक ,साहित्य,कला,क्रिडा,व नाटय क्षेत्रातील काम करणा-या संस्थांना त्यांच्या विभगाच्या असलेल्या मान्यतेचे पत्र.

करीता उपरोक्त नियामावलीतील तरतूदीनुसार संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, संस्थेच्या वार्षीक लेखा परिक्षण अहवालाची प्रत, संस्थेचे चार्टड अकाऊन्ट यांच्या मार्फत झालेल्या लेखा परिक्षणची प्रत , शैक्षणिक ,साहित्य, कला, क्रिडा, व नाटय क्षेत्रातील काम करणा-या संस्थांना त्यांच्या विभगाच्या असलेल्या मान्यतेचे पत्र.सादर करण्याच्या अटीवर तसेच महानगरपालिका सर्वसाधारण सभेची मान्यता अपेक्षित धरुन वरील कार्यक्रमासाठी मनपा आदेश क्र.साप्रवि/११८५/२०१५ दि.२८.४.२०१५ अन्वये रु.५०,०००/- चे अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**विषय:-४**

श्री विजय जोशी जिल्हा परिषद प्रतिनिनी, दैनिक सामना यांनी दिनांक २२.४.२०१५ च्या निवेदना व्दारे दिनांक ०१.०५.२०१५ रोजी महाराष्ट्र दिना निमित्त महाराष्ट्रातील विविध भागातील लोककला व परंपरेचे सांगड घालणारा मराठमोडया सांस्कृतीक कार्यक्रमाचे महानगरपालिकेच्या वतीने आयोजन केल्यास नांदेडकरांना सांस्कृतीक मेजवाणी लागेल त्यासाठी गंध मराठी मातीचा हा कार्यक्रम आयोजीत करुन महाराष्ट्रातील मराठवाडयातील दिग्गज कलावंतांना बोलावून सदर कार्यक्रम केल्यास शहरातील रसीक प्रेक्षकांना सांस्कृतीक मेजवाणी दिल्याचे स्मरण राहिल त्यासाठी रु. २.०० लक्षाचे आनुदान देण्याची विनंती केली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६(२१),(२२),(२५), (२६) व (४१) अन्वये सास्कतिक कार्यक्रम /क्रिडा/महिला व बाल कल्याण संस्थाना देण्यात येणा-या अनुदानाची नियमावली तयार केली असून या नियमावली अनुदान वाटपाची कार्य पध्दत कलम ३ नियम ५ मध्ये नमूद केल्यानुसार कोणत्याही विविध पंजीकृत अथवा नोंदणी कृत शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, साहित्य, कला क्रिडा नाटय क्षेत्रातील संस्थेस किंवा त्या संस्थेच्या संलग्न संस्थेस ३ वर्षातून एकदा अनुदान देण्याची तरतूद आहे. तथापी अनुदान मागणीसाठी अर्ज करते वेळेस खालील कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.

५) संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत
६) संस्थेच्या वार्षीक लेखा परिक्षण अहवालाची प्रत
७) संस्थेचे चार्टड अकाऊन्ट यांच्या मार्फत झालेल्या लेखा परिक्षणची प्रत
८) शैक्षणिक ,साहित्य,कला,क्रिडा,व नाटय क्षेत्रातील काम करणा-या संस्थांना त्यांच्या विभगाच्या असलेल्या मान्यतेचे पत्र.

वरील पैकी कोणतेही कागदपत्र अर्जदाराने अर्जा सोबत सादर केलेले नाही तथापि मुख्यलेखाधिकारी यांनी रु ५०,०००/- अनुदान देण्याचा अभिप्राय दिला आहे. करिता उपरोक्त नियामावलीतील तरतूदीनुसार संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, संस्थेच्या वार्षीक लेखा परिक्षण अहवालाची प्रत, संस्थेचे चार्टड अकाऊन्ट यांच्या मार्फत झालेल्या लेखा परिक्षणची प्रत, शैक्षणिक, साहित्य, कला, क्रिडा, व नाटय क्षेत्रातील काम करणा-या संस्थांना त्यांच्या विभगाच्या असलेल्या मान्यतेचे पत्र. सादर करण्याच्या अटीवर तसेच महानगरपालिका सर्वसाधारण सभेची मान्यता अपेक्षित धरुन वरील कार्यक्रमासाठी मनपा आदेश क्र.साप्रवि/११८९/२०१५ दि.२८.४.२०१५ अन्वये रु.५०,०००/- चे अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**विषय क्र.५**

नांवामनपाकेच्या नगररचना, पाणी पुरवठा व मलनिस्सारण स्थानिक संस्था कर, व मलेरिया विभागासाठी प्रत्येकी एक जीपची आवश्यकता आहे. या विभागांना नविन जीप दिल्यास त्या त्या विभागाचे कामात सुरळीतता येईल. मे.टाटा मोटर्स लि.यांचे दर करारावर सदरच्या चारही टाटा सुमो गौल्ड बिएस ४ जीप खरेदी करावयाच्या आहेत.एका जीपची किमत रु.५,२६,०४१/-एवढी आहे. चार जीप खरेदीसाठी रु.२१,०४,१६४/- एवढी लागणार आहे. या रक्कमेच्या ९० टक्के रक्कम बॉम्बे मर्कन्टाइल को.ऑप.बॅक लि.नांदेड हे देण्यास तयार आहे. पाच वर्षाकरीता कर्ज घेतल्यास प्रतिमहिणा रु.४३,९६४/- असा हप्ता येईल.

करीता मनपाची १० टक्के रक्कम भरणा करुन वरील प्रमाणे बॅकेकडून ९० टक्के कर्ज घेण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस्तव.

**विषय क्र.६**

नांवामनपा हध्दीत प्रभाग क्र.२३ अ मधील विविध भागात भूमिगत गटार लाईन टाकणेकरीता प्रस्तूत कामाचे उपअभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन सालसन २०१३-२०१४ च्या म.जी.प्रा.च्या जिल्हा दर सुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक रु.२५,००,०००/-चे तयार करुन सादर केले आहे. प्रस्तूत प्रकरणी मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.८३ दि.१४.८.२०१४ अन्वये शक्तीनगर भागात दलित वस्ती मध्ये समाविष्ट असल्याने सि.सि.रोड/सभागृह/नालीचे काम प्रस्तावित केलेले आहे. सदर भागात मलनिस्सारण व्यवस्था करणे महत्वाचे असल्याने सदर काम प्रथम प्राधान्याने घेणे आवश्यक असून लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

स्वाक्षरीत/-

**नगरसचिव,**

. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.